# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८

दूरध्वनी -२३०२३९००/ २३०७५५३९ Website : www.msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२


## प्रसिध्दी पत्रक क्र. १०

## - एस.टी. च्या प्रवासभाडयात वाढ -

**मुंबई, शुक्रवार, दि. १२ मार्च, २०१०**

महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या " **आपोआप भाडेवाढ सूत्रात** " अंतर्भूत असणा-या डिझेलच्या दरात नुकत्याच झालेल्या रु २.३७प्रती लिटर वाढीमुळे राज्य परिवहन प्राधिकरणाने ( STA ) रा. प. महामंडळास आपल्या सर्व प्रवासी वाहतूक सेवांच्या प्रवासभाडयात आज दि. १२ मार्चच्या मध्यरात्रीपासून वाढ करण्यास मंजूरी दिली आहे. सदरची भाडेवाढ सरासरी टक्केवारीमध्ये ७.६९% एवढी आहे. कर्नाटक, केरळ व अन्य राज्य परिवहन महामंडळांनी ३ मार्चपासूनच प्रवासी भाडयात वाढ केली आहे. डिझेल दरवाढीमुळे रा.प.महामंडळास दररोज ३६ लाख रुपयांचे नुकसान होत असल्याने सदरची भाडेवाढ करणे अपरिहार्य ठरले आहे. जून २००८ नंतर झालेल्या डिझेल, बसेसना लागणारे सुटटे भाग, टायर - टयुब, चॅसिस व इतर खर्चात वाढ होऊनही रा.प. महामंडळाने प्रवासभाडयात वाढ केली नव्हती.

या अनुषंगाने आज मध्यरात्रीपासून काही महत्त्वाच्या मार्गांचे प्रवासभाडे पुढीलप्रमाणे राहील :-

| **वातानुकूलित - शिवनेरी** | **सध्याचे भाडे रु.** | **नविन भाडे रु.** |
|---|---|---|
| दादर - पुणे रे. स्टेशन | २२५ | २५० |
| ठाणे - स्वारगेट ( पुणे ) | २२५ | २५० |
| बोरीवली - स्वारगेट (पुणे) | २६५ | ३०० |
| पुणे - नाशिक | ३०५ | ३४५ |
| पुणे - औरंगाबाद | ३४० | ३८० |
| मुंबई - औरंगाबाद | ५४० | ६०० |

| मार्ग | साधी - जलद | | रात्र सेवा | | निम आराम | |
|---|---|---|---|---|---|---|
| *प्रवास भाडे (रू.)* | *जुने* | *नविन* | *जुने* | *नविन* | *जुने* | *नविन* |
| मुंबई - कोल्हापूर | २५७ | २७७ | २८४ | ३२७ | ३३० | ३८० |
| मुंबई - सातारा | १७६ | १८९ | १९४ | २२३ | २२५ | २५९ |
| मुंबई - स्वारगेट(पुणे) | १०९ | ११८ | १२० | १३९ | १४० | १६१ |
| मुंबई - मिरज | २६५ | २८६ | २९२ | ३३७ | ३४० | ३९१ |
| मुंबई - चिपळूण | १७६ | १८९ | १९४ | २२३ | २२५ | २५९ |
| मुंबई - मालवण | ३३२ | ३५७ | ३६६ | ४२१ | ४२५ | ४८९ |
| मुंबई - सोलापूर | २६९ | २९० | २९७ | ३४२ | ३४५ | ३९७ |
| मुंबई - औरंगाबाद | २५४ | २७३ | २८० | ३२२ | ३२५ | ३७४ |
| मुंबई - लातूर | ३१६ | ३४० | ३४८ | ४०१ | ४०५ | ४६६ |
| मुंबई - धुळे | २२६ | २४४ | २४९ | २८७ | २९० | ३३४ |
| मुंबई - जळगांव | २८९ | ३११ | ३१८ | ३६६ | ३७० | ४२६ |
| मुंबई - पंढरपूर | २४६ | २६५ | २७१ | ३१२ | ३१५ | ३६२ |
| दादर - नाशिक | ११७ | १२६ | १२९ | १४९ | १५० | १७३ |
| पुणे - नागपूर | ४९१ | ५२५ | ५४२ | ६१९ | ६३० | ७१९ |
| पुणे - अमरावती | ३९० | ४२० | ४३० | ४९५ | ५०० | ५७५ |
| पुणे - नाशिक | १४० | १५१ | १५५ | १७८ | १८० | २०७ |
| पुणे - कोल्हापूर | १५२ | १६४ | १६८ | १९३ | १९५ | २२४ |

डिझेल व अन्य घटकांतील भरीव दरवाढीमुळे रा.प.महामंडळास आपल्या प्रवासभाडयात वाढ करणे भाग पडले असून प्रवाशांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी रा.प.महामंडळ कटीबध्द आहे. प्रवाशांनी आजतागायत दिलेले सहकार्य कायम ठेवावे, असे आवाहन रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री,दीपक कपूर यांनी केले आहे.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**